॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ३१ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सरदार वल्लभभाई पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी निमित्त आदरांजली वाहण्यात आली. यावेळी एकात्मता दौड आयोजित करून राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. राष्ट्रीय एकतेची शपथ यावेळी घेण्यात आली. जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी शपथेचे वाचन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने एकात्मता दौड आयोजित करण्यात आली होती. कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी हिरवी झेंडी दिली. विद्यापीठातील रासेयो स्वयंसेवक यामध्ये सहभागी झाले होते. रासेयोचे संचालक डॉ. सचिन नांद्रे तसेच प्रा. मनोज इंगोले यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ३१ ऑक्टोबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी